# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.01.2025** **वार- सोमवार**

---

**<u>प्रकाशआबिटकर</u>**

पुण्यासह राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णांची संख्या वाढत आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्व उपाययोजना करण्यात आल्या असून पुणे महापालिका आणि आरोग्य यंत्रणेला आवश्यक सुचना देण्यात आल्या आहेत. असं आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज पुण्यात पत्रकारांशी बोलताना सांगितलं. जीबीएस आजार संसर्गजन्य नाही. मात्र प्रतिकारशक्ती कमी असलेल्या रूग्णांनी काळजी घ्यावी असं आवाहन आबिटकर यांनी केलं आहे.

दरम्यान जीबीएसच्या वाढत्या रुग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर केंद्राचं सात सदस्यांचं पथक राज्यात दाखल झालं असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. राज्यातली जीबीएसची रुग्णसंख्या १०१ झाली असून, त्यातले १६ रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. पुण्याच्या ग्रामीण भागामध्ये ६२, पुणे महापालिका हद्दीत १९, पिंपरीचिंचवड महापालिकेच्या हद्दीत १४ आणि इतर जिल्हयात जीबीएसचे ६ रुग्ण आढळले आहेत. पुणे शहर आणि ग्रामीण भागातल्या ज्या परिसरात या आजाराचे रुग्ण आढळून आले, त्या परिसरातल्या २५ हजार ५७८ घरांचं सर्वेक्षण पुणे आरोग्य विभागानं केलं आहे. दरम्यान सोलापूरमध्ये एका संशयित रुग्णाचा मृत्यू झाला आहे.

**<u>संविधान</u>**

भारतीय संविधानाला यंदा ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत; यानिमित्तानं संविधानाला सांगितिक मानवंदना देण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने प्रजासत्ताक दिनी ‘आम्ही भारताचे लोक’ हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. या ऐतिहासिक सोहळ्याची नोंद ‘वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड’मध्ये झाली आहे. याबाबतची घोषणा वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डच्या कार्यकारी अधिकारी प्रिती मेनन यांनी या कार्यक्रमात ऑनलाइन माध्यमातून केली. विविध राज्यातून तसंच नेपाळमधून आलेल्या एकंदर दीडशे कलाकारांनी १६ भाषांमध्ये भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचं गायन केलं. महापालिकेच्या दिव्यांग भवन फाऊंडेशननं सांकेतिक भाषेमध्येही संविधानाच्या प्रास्ताविकेचं सादरीकरण केलं.

**<u>प्रकाशन</u>**

ज्ञानप्रबोधिनीच्या माजी विद्यार्थ्यांनी प्राध्यापक विवेक कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली ‘प्रचिती’ नावाची संघटना स्थापन केली आहे. आपल्या जीवनाचं ध्येय शोधतांना त्याला समाजकार्याची जोड देत विविध विधायक कामं या संघटनेतल्या अनेकांनी केली आहेत. यातील 20 प्रातिनिधिक कामांचा प्रवास उलगाडणाऱ्या ‘हे तो प्रचितीचे जगणे...’ या पुस्तकाचं प्रकाशन पुण्यात नुकतंच झालं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ डॉक्टर माधवराव गाडगीळ होते. स्नेहालय संस्थेचे संस्थापक गिरीश कुलकर्णी हे देखील या कार्यक्रमाला उपस्थित होते. एकीकडे सामाजिक काम उभं करतानाच माणूस घडवण्याचं कार्य प्रचितीनं केलं आहे, त्यामुळे ते काम चिरकाल टिकणारं आहे, असं कुलकर्णी यावेळी म्हणाले.

**<u>Pcmc</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा शिक्षण विभाग विद्यार्थी सुरक्षिततेसाठी विविध उपक्रम राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय परिसरातील सार्वजनिक रस्त्यांची माहिती संकलित केली जात आहे. या रस्त्यांवर वाहनांची गती नियंत्रित करण्यासाठी, तसंच पाच हजार चौरस मीटर क्षेत्र वाहनमुक्त करण्यासाठी महापालिका प्रयत्न करणार आहे. सायकलवरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही विशेष सोय करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

**<u>स्कूलबस</u>**

पुणे महापालिकेच्या प्राथमिक विभागाच्या विद्यानिकेतन आणि क्रीडानिकेतन शाळेतल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीच्या दृष्टीनं स्कूल बसमध्ये आता महिला मदतनीस नेमल्या जाणार आहेत. त्यासाठी महापालिकेच्या पुढच्या वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद केली जाणार आहे.

**<u>भुयारीमार्ग</u>**

पुणे मुंबई रस्त्यावर खडकी पोलीस ठाण्यालगतच्या लोहमार्गाखाली भुयारी मार्गाचं रुंदीकरण करण्याबाबत आमदार सिद्धार्थ शिरोळे आणि रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक राजेश कुमार वर्मा यांच्या दरम्यान आज एक बैठक झाली. यात सकारात्मक चर्चा झाली असून येत्या वर्षभरात नवीन भुयारी मार्ग बांधून पूर्ण करण्याचं निश्चित करण्यात आलं.

**स्वच्छता**

स्वच्छतेचे नियम न पाळणाऱ्या ५२ हजारांहून अधिक नागरिकांवर पुणे महापालिका प्रशासनाने गेल्या वर्षभरात कारवाई केली आहे. यातून तीन कोटी 28 लाख रुपयांचा दंड वसूल केला असल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त आणि घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी दिली आहे.

**पुरस्कार**

बलराज साहनी - साहिर लुधियानवी फाऊंडेशन तर्फे देण्यात येणारा बलराज साहनी पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते, लेखक माधव वझे यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते येत्या ३१ जानेवारीला हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचं फाऊंडेशनचे सचिव सुरेश टिळेकर यांनी सांगितलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३४ तर किमान तापमान १३ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**